# उसाचे गु-हाळाचा मनमुक्त आनंद

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

ही गोष्ट म्हणजे बालपणीची छान आठवण! सन १९६० या वर्षातील आहे. त्यावर्षी माझ्या वडिलांची बदली पदोन्नतीवर ता.कळंब जि. उस्मानाबाद (तेव्हाचा) (आताचा जि. धाराशिव!) येथे मुख्याध्यापक पदावर झाली होती. त्या काळातही ती शाळा दहावी पर्यंतची होती. तसेच, शाळेची इमारतही मोठी होती. याशिवाय, त्या शाळेचे पटांगणही खूप मोठे होते. वडीलांची शाळेत विद्यार्थ्यांना शिकविण्याची पध्दत खूप उत्कृष्ट आणि शिस्तबद्ध अशी होती. तसेच संपुर्ण शाळेतील शिक्षकांवर व विद्यार्थ्यांवर त्यांचा खूप दरारा होता. सर्व शिक्षकांनाही ते उत्कृष्ट रीतीने मार्गदर्शन करीत असत. याचा परिणाम असा झाला की, सन १९६० साली संपुर्ण महाराष्ट्रात कळंब येथील शाळेतील दहावीच्या वर्गातील एक विद्यार्थी संपुर्ण महाराष्ट्रात अत्यंत उत्कृष्ट गुणाने पहिला आला होता. तसेच, सर्वच्या सर्व विद्यार्थी पहिल्या श्रेणीत उत्तीर्ण झाले होते. त्यामुळे, त्यावर्षी त्याकाळातील महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री श्री.यशवंतराव चव्हाणसाहेब यांनी कळंबच्या शाळेला भेट देवून माझे वडील श्री. एकनाथराव निलेगावकर यांचा मोठा सत्कार केला होता. त्याकाळातही दोघांच्या फोटोसहीत ती बातमी वर्तमानपत्रात पहिल्या पानावर छापून आली होती. दूसरी आठवण अशी आहे की, त्याकाळात गावातील सर्व लोक शिक्षकांना गुरु म्हणून खूप मान देत असत. तसेच सर्व प्रकारची मदत करीत असत. गावातील सार्वजनिक कार्यक्रमांना, घरगुती सण, समारंभाला सहकुटुंब आमंत्रण देत असत.असंच एकदा गावातील एका ब-यापैकी श्रीमंत शेतकरी काकांनी वडीलांना शेतातील गु-हाळासाठी खास आमंत्रण दिले होते. तसेच, त्यांनी गावातील इतर लोकांनाही बोलाविले होते. त्यावेळेस मी वयाने साधारणपणे पाच ते सहा वर्षांचा असेन. त्या शेतकरीकाकांना सर्वजण आप्पा म्हणत असत. आप्पांचं शेतही खूप मोठं होतं. त्यांच्या शेतात ब-याच मोठ्या प्रमाणात ऊसाचं पीक आलं होतं. त्यांच्या शेतात पोहोचल्यावर सर्व लोकांसोबत आम्हीही एका मोठ्या सतरंजीवर बसलो होतो. गु-हाळ म्हणजे काय कार्यक्रम असतो. हे मला तिथं गेल्यावरच समजलं. गुळ तयार करण्यासाठी कल्हई करतात. कल्हई म्हणजे, ऊसाच्या रसाच्या दोनशे तीनशे घागरी बसतील एवढ्या मोठ्या आकाराची कढई असते. त्या कढईत ऊसाचा रस ओतल्यावर पुर्ण कढई भरल्यानंतर पाच सहा माणसं संपुर्ण कढईच्या भोवती हातात झा-याच्या पध्दतीच्या मोठ्या काठ्यांनी कढईतील ऊसाचा रस ढवळत असतात. कढईच्या खालून सरपणाची लाकडे, मोठ्या गोव-या खालून रॉकेल घालून काडीपेटीच्या काडीने पेटविलेल्या असतात. बरीच उष्णता मिळाल्यानंतर ऊसाचा रस अनेक तासांनंतर हळूहळू घट्ट होवू लागतो. काठ्यांनी रस ढवळल्यानंतर जसजसा तो रस घट्ट होवू लागतो. तसंतसं रसाचं रुपांतर गुळाच्या पाकात होवू लागतं. या पद्धतीला कल्हई म्हणतात हे तेव्हा समजले. आम्ही बसलेल्या ठिकाणी थोड्या वेळाने त्यांच्या नोकरांनी कोवळ्या कोवळ्या कणसांचा,



लुसलुशीत कोवळा कोवळा हुरडा आणून समोर ठेवला. सोबत ताजा ताजा गुळही होता. तसेच, चवीला गावरान शेंगदाण्याची चटणी देखील होती. असा मस्त बेत होता. मग सर्वांनी यथेच्छ हूरडा आणि गुळाचा आस्वाद घेण्यास सुरुवात केली. चटणीसोबत हूरडा आणि गुळ सर्वजण एकत्रितपणे खात असताना सर्वांच्या चेहऱ्यावर एक वेगळाच छान आनंद आणि समाधान दिसून येत होतं. थोड्या वेळाने त्यात अजून एका पदार्थाची भर पडली. तो पदार्थ म्हणजे सर्वांचा आवडता ढाळा, म्हणजेच हिरवागार ताजा ताजा टपोरे दाणे असलेला हरभरा! मग, तोंडाची चव बदलण्यासाठी सर्वांनी ढाळ्यावर म्हणजेच हरभ-यावर ताव मारायला सुरुवात केली. खाताखाता दरम्यानच्या





कालावधीत एकमेकांशी गप्पा सुरुच होत्या. गप्पा मारताना आपण किती खातो आहे याचं भानही कुणास नव्हतं. फक्त समोर जो पदार्थ येईल तो पदार्थ यथेच्छ खात राहायचं एवढा एकच उद्योग सगळ्यांचा होता. त्यानुसार, त्यानंतर, लालबुंद, तसेच गुलाबी व हिरवे हिरवे मोठमोठे पेरु आले. मग, काय विचारता! सगळ्यांनी मग, पेरुकडे आपला मोर्चा वळवला. हा हा म्हणता एकेक जणांनी सर्व प्रकारच्या पेरुंचा आस्वाद घ्यायला सुरुवात केली. मुख्य म्हणजे, सर्वांच्या चेह-यावरची लाली बदलू लागली. हा प्रताप पेरुंचा होता. आता गंमत अशी झाली की, बरेच जण आपल्या पोटावरुन म्हणा किंवा काही जण ढेरीवरुन म्हणा हात फिरवायला लागले. म्हणजे आपलं पोट काय म्हणतंय यांचा अंदाज घेवू लागले. हा त्यांचा उद्योग चालू असताना शेतकरीकाकांच्या दोन नोकरांनी चपट्या उसाच्या टिपरांना चिकाचा गुळ लावून ते पंचवीस,तीस चिकाच्या गुळाचे टिपरे पुढ्यात आणून ठेवले. तो गु-हाळातून नुकताच तयार केलेला ताजा गुळ असल्याने सर्वांनी त्याची चाखण्यास हातात ते चिकाच्या गुळाचे टिपरे घेवून गुळ खाऊ लागले. मुख्य म्हणजे सर्वांना तो आवडला. आतापर्यंत चार पदार्थांचे सेवन झाले होते. गोड पदार्थही खाऊन झाला. पण, मुख्य रसपानाचा कार्यक्रम राहिला होता. त्यामुळे, लगेच दोन नोकरांनी ऊसाच्या रसाचं


भलं मोठं पातेलं आणून ठेवलं. ते प्रत्येकाला मोठा ग्लास भरुन उसाचा रस देवू लागले. सोबतीला थंडगार बर्फाचे खडे होतेच! ज्याला जसं पाहिजे तसं बर्फाचे खडे टाकून जे ते तो

रस आनंदाने पिऊ लागले. पहिल्या पदार्थापासून शेतकरीकाकांचा तो पदार्थ मनसोक्त खाण्याचा खूप आग्रह होता. आताही ऊसाच्या रसाबाबतही त्यांनी तसाच आग्रह केला. तेव्हा, बहुतेक सगळ्यांनी पोटाला हात लावून व त्यांना हाताने नको म्हणून सांगितले. पण,आप्पा वडीलांना म्हणाले गुरुजी एक विनंती आहे.उद्या तुमच्या घरी आजच्या सारखे काही फळं व हूरडा तुमच्या घरी पाठवून देतो नाही म्हणू नका! माझी मनापासूनची इच्छा आहे. असं आप्पा म्हणाल्यावर वडील म्हणाले तुमचा इतका आग्रहंच आहे तर पाठवून द्या.नंतर सर्वांनी आप्पांना हात जोडून मनापासून धन्यवाद! म्हणून त्यांचा निरोप घेतला. खरंच! आप्पानी शब्द दिल्याप्रमाणे दूस-या दिवशी सकाळीच त्यांच्या गड्यासोबत बैलगाडीमध्ये पांच पांच जाड ऊसाच्या बांधलेल्या दोन मोळ्या, ताज्या हरब-याच्या पांच पेंढ्या , वीस पंचवीस गुलाबी,हिरवे मोठे पेरु, मोठा तांब्याभर चिकाटीचा गुळ ,मोठं पातेलं भरुन हुरडा आणि एक घागरभर ऊसाचा ताजा रस आमच्या घरी पाठवून दिला. अशी मनमोकळ्या स्वभावाची, जिव्हाळ्याची, आत्मियता असलेली निरपेक्षवृत्तीची

आप्पांसारखी माणसं होती त्यावेळेस! अशी दलाखमोलाची माणसं गुरुजींना देवस्थानी मानत असत. अशी माणसं आपल्याला लाभणं , सहवासात येणं सध्याच्या एकविसाव्या शतकात तर फार दूर्मिळ आहे. या शतकातील लहान मुलांना ऊसाचा गु-हाळ आणि त्याची कल्हई म्हणजे काय! आणि तो काय प्रकार असतो हे तर माहितींच नाही. खेडेगावातल्या मुलांना माहीत असतं. असा हा बालपणीचा आनंद अवीट आणि अमृतमय होता.अशी ही अविस्मरणीय बालपणीची अमृतमय आठवण आहे.

***





विश्वास देशपांडे,
चाळीसगाव
मो. ९४०३७४९९३२

## रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**


### कर्मयोगी रवींद्रनाथ

तसे पाहिले तर गुरुदेवांचे घराणे हे जमीनदार घराणे होते परंतु सामान्य शेतकऱ्यांबद्दल त्यांना जिव्हाळा होता. त्यांच्या सुखदुःखाशी ते एकरूप झाले होते म्हणूनच स्वतः शेतीत राबण्यासाठी, त्यात घाम गाळण्यासाठी ते पुढे सरसावले. त्यात त्यांना कधी कमीपणा वाटला नाही. त्यांनी नुसतीच शेती केली असे नाही तर ते त्यातील उत्तम जाणकारही होते आणि आपल्या कृषीविषयक प्रयोगातून त्यांनी अनेक चांगले निष्कर्ष आपल्या विद्यार्थ्यांपुढे आणि शेतकऱ्यांपुढे ठेवले.

जमीन किंवा शेती ही आपली आई आहे. तिला आपण जेवढे देऊ त्यापेक्षा अनेक पटींनी ती आपल्याला ते परत देते. त्यामुळे या काळया आईची हात राबवून मशागत कशी करावी याचे त्यांना उत्तम ज्ञान होते. ते केवळ धरतीची गाणी गाणारे भाट नव्हते. दौत आणि औत या दोन्ही गोष्टी हातात हात घालून चालल्या पाहिजेत या मताचे ते होते परंतु दुर्दैवाने इंग्रजी सत्ता आल्यानंतर इंग्रजांनी दौत आणि औत वेगळे केले. शेतकऱ्याचा आणि शिक्षणाचा संबंध तोडला. शहरात इंग्रजी शिक्षण घेणारी मुले शेतात राबायला किंवा कष्ट करायला कमीपणा मानू लागली. शहरी संस्कृती आणि ग्रामीण संस्कृती यात अंतर पडत गेले आपल्या समाजाचा किंवा देशाचा विकास करायचा असेल तर आधी खेड्यांचा विकास झाला पाहिजे हे तत्व गांधीजींनी प्रतिपादन करण्याच्या आधी अनेक वर्षे गुरुदेवांनी सांगितले होते.

गुरुदेवांनी ठरवले असते तर आपल्या मुलाला तत्कालीन श्रीमंतांप्रमाणे इंग्लंडमध्ये बॅरिस्टर होण्यासाठी पाठवले असते. परंतु त्याने कृषीविषयक शिक्षण घेऊन ग्रामीण भागात काम करावे आणि शेतकऱ्यांच्या विकासासाठी कार्य करावे असे त्यांना वाटत होते. म्हणून त्यांनी त्याला कृषीविषयक आधुनिक शिक्षण घेण्यासाठी अमेरिकेला पाठवले. शेतीचे नवनवीन प्रयोग अमेरिकेमध्ये होत होते. शेतकऱ्यांनी शेतीचे उत्पादन वाढवले पाहिजे. त्यासाठी रसायनशास्त्राचे ज्ञान त्यांनी करून घ्यायला हवे असे त्यांना वाटत होते. नवी बीजे पेरा, नवीन अवजारे वापरा, नवीन तंत्रज्ञान आत्मसात करा असा नव्या युगाचा मंत्र या दार्शनिकाने शेतकऱ्यांना दिला.

परंपरा आणि आधुनिकता यांचा मेळ घालणारा हा आधुनिक ऋषी होता. भूतकाळाला वर्तमानकाळाशी जोडणारा एक अनोखा दुवा होता. समाजाच्या विकासासाठी अखेरच्या श्वासापर्यंत कार्यरत राहणारा हा कर्मयोगी होता. त्यांनी आपल्या आयुष्याच्या अखेरच्या काळात पदार्थविज्ञानशास्त्रावर ग्रंथरचना केली. बुद्धीच्या विकासासाठी विज्ञान विचार करणे आवश्यक आहे असे त्यांचे मत होते. विश्वभारतीतल्या प्रमथनाथ सेनगुप्त या फिजिक्सच्या प्राध्यापकांना बरोबर घेऊन विश्वपरिचय नावाचा आधुनिक विज्ञान कोश त्यांनी तयार केला. आपल्या आयुष्याच्या उत्तरार्धात हातात जपमाळ घेऊन न बसता अखंडपणे कार्यरत राहणारा हा कर्मयोगी होता. मऊ मेणाहुन आम्ही विष्णुदास, कठीण वज्रास भेदू ऐसे ही उक्ती सार्थ करणारे हे व्यक्तिमत्व होते. मातीत रमणारी ही बोटे काव्यलेखन आणि गायन वादनातही रमायची. घरामध्ये पाहुणे असतील तर गृहिणीला स्वयंपाकातही मदत करायची. अशा या नाजूक आणि कलाप्रेमी बोटांसोबतच कुस्तीचे डावपेच लढू शकणारे बलदंड बाहू देखील त्यांना लाभले होते. गुरुदेवांचे शरीर एखाद्या पंजाबी शेतकऱ्याप्रमाणे धडधाकट होते. त्यांना मल्लविद्या शिकण्यासाठी त्यांच्या वडिलांनी एक पहिलवान सुद्धा ठेवला होता. इथे भगवान कृष्णाची आठवण येते. कृष्णाची नाजूक बोटे बासरीचे मधुर स्वर देखील छेडत असत आणि अनेक राक्षसांना आणि मल्लांना अस्मान दाखवणारे त्याचे बळकट बाहू देखील होते. **(क्रमशः)**






## इंदापूरी निखारे

### कलांचा आदर करा !



**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

सात आठ वर्षांपूर्वी...
मी काहीतरी वाचत बसलेलो होतो...
नातु अंशुल आला होता
आणि म्हणाला...
आबा हे चित्र पहा ! कसे आहे ?
मी म्हणालो अरे वा ! मस्तच
पण तेव्हढ्यावर समाधानी झाला नाही...
त्याने चित्राचे वर्णन केले...
एक कथा त्याची चित्ररुपाने...
तयार केली होती...
त्याला ते उत्तर अपेक्षित असावे...
पण आबांना काही कळत नाही...
असे त्याला वाटले...
आणि गोष्ट सांगायला सुरुवात केली...
आबा, हे बघ स्कूल बस मधुन सगळी मुले उतरतात...
आणि सगळ्या मुलांना
पेप्सी आणि नारळपाणीची गाडी दिसते...
बाबांकडे हट्ट करतात...
सगळी मुले नारळपाणी पितात...
पण एक मुलगा पेप्सी पितो...
त्याच्या पोटात किडे होतात...
तसा तो चित्र काढतच असतो...
कसे काढतो त्याचे विशेष नाही...
पण चित्र काढता काढता...
त्याची एक कथा तयार करतो ...
आणि सांगतो पण...
चित्रकला खूप काही शिकवते...
चित्र काढणे...
त्यात रंगवत असतांना एक कथा मनात...
आणि कथाकथन पण...
लहान मुले , नातवंडे
जे काय करत असतात...
ते आपल्याला कळत नाही...
आपण वेळ पण देत नाही...
मुळात मानसिकता बदलून गेली...
चित्रकला, नाटक, नृत्य, खेळ याकडे दुर्लक्ष...
आणि आज्जी आजोबा नको...
अनेक कलांना दृष्टीआड करण्यामुळे...
अनेक भावनिक नाते हरवत चाललेय न कळत...

# लोकमान्य टिळक पुण्यतिथी आणि अण्णाभाऊ साठे जयंती दिनी अभिवादन

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

**छत्रपती संभाजीनगर** – दिनांक १ ऑगस्ट २०२५ रोजी ज्ञान संदीप शिक्षण संस्था संचलित संत तुकाराम प्राथमिक विद्यालय व तुकाराम सोनवणे हायस्कूल, डॉ. आंबेडकर नगर, सिडको एन-७, छत्रपती संभाजीनगर येथे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी आणि साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची जयंती निमित्त अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. कार्यक्रमासाठी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रकाशराव सोनवणे, सचिव संगीता खिल्लारे, तसेच मुख्याध्यापक संदीप सोनवणे यांची उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाची सुरुवात लोकमान्य टिळक व अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादनाने झाली. यानंतर शिक्षक व विद्यार्थ्यांनी प्रतिमांचे पूजन करून त्यांच्या कार्याला श्रद्धांजली अर्पण केली.

संस्थेचे अध्यक्ष प्रकाशराव सोनवणे यांनी अण्णाभाऊ साठे यांचे जीवन आणि त्यातील प्रेरणादायी प्रसंग विद्यार्थ्यांना सांगितले. यावेळी त्यांनी लोकमान्य टिळकांच्या स्वातंत्र्यलढ्यातील योगदानाबद्दलही माहिती दिली. मुख्याध्यापक संदीप सोनवणे यांनी इंग्रजांविरुद्ध टिळकांनी दिलेल्या लढ्याचे उदाहरण देत विद्यार्थ्यांना प्रेरणा दिली, तसेच अण्णाभाऊ साठे यांच्या सामाजिक कार्यावरही मार्गदर्शन केले.

इयत्ता पहिली ते दहावीपर्यंत प्रत्येक वर्गातील दोन विद्यार्थ्यांनी टिळक व साठे यांच्या जीवनकार्यावर मनोगत व्यक्त केले. सायमा शेख,समरिन शेख,प्रेमराज चाबुकस्वार,प्रेम शिंदे,सम्राट भामरे,व शिक्षक संजीव चौधरी व वैशाली बागुल यांनी विद्यार्थ्यांना योग्य दिशा देणारे मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सुनील चौधरी, संजीव चौधरी, नजमा खान, विजय पाटील, साहेबराव शिंदे, हर्षल पगारे, वैशाली बागुल यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नववीतील विद्यार्थिनी मोनिका मगरे हिने केले, तर आभार प्रदर्शन खुशी बनकर या विद्यार्थिनीने केले.







